REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 7 | APRIL - 2022

# मराठीतील पहिले वगनाट्य मोहना बटाव – एक अभ्यास

**प्रा. डॉ. शशिकांत खिलारे**
प्रमुख, मराठी विभाग, श्रीमती चं. बा. शाह महिला महाविद्यालय, सांगली.

**सारांश :-**

मध्ययुगीन कालखंडापासून मराठी माणसांचे लोकरंजन करण्याचे कार्य लोकरंगभूमीवरील विविध लोककलांनी केले आहे. लोककलामध्ये प्रामुख्याने दशावतार, ललित, दंडार, जागरण, गोंधळ, मेळे, फार्स, कीर्तन, जलसा आणि तमाशा या सारख्या अनेक लोककलांचा समावेश आहे. या लोककलांनी प्रामुख्याने लोकरंजन आणि समाजप्रबोधनाचे कार्य हाती घेतले होते. तेच त्यांचे प्रयोजन होते. तमाशा या लोककलेने समाजातील अभिजन आणि बहुजन वर्गाचे रंजन केले आहे. तमाशा हा सर्व लोककला प्रकारापैकी सर्वात लोकप्रिय कला प्रकार आहे. तमाशाचा रचनाबंध हा गण, गौळण, फार्स, बतावणी, सवाल-जवाब रंगबाजी आणि वग अशा स्वरूपाचा असतो. तमाशा या लोककलेचे हेच घटक आहेत. तमाशाच्या या प्रत्येक घटकामधून लोकांचे रंजन केले जाते. परंतु तमाशाच्या रचनाबंधातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे वग असतो. वग ही एक प्रकारची आख्यानक लावणीच असते. नाटकाच्या काही अभ्यासकांनी सध्याच्या नाटकाचा जन्म तमाशामधून झाला आहे असे नमूद केले आहे. विशेषतः तमाशातील वगामधून आधुनिक नाटक जन्माला आले आहे असे मानले जाते. त्यामुळे तमाशातील वग महत्त्वाचा असतो. हे वग नाट्य आख्यानक लावणी प्रकारचे असते. या आख्यानक लावण्या प्रामुख्याने मध्ययुगीन कालखंडात पौराणिक, ऐतिहासिक विषयावरील असत. रामायण, महाभारत या पौराणिक ग्रंथातील लोकप्रिय आख्यान निवडून ते लोकांसमोर रंजकपणे सादर केले जात असे. मात्र अव्वल इंग्रजी कालखंडात तमाशातील आख्यानक लावणीही भौतिक किंवा लौकिक विषयावरील लिहिली गेली आहे. उमा-बाबू सावळजकर यांनी त्याकाळी 'मोहना बटाव' हे आधुनिक वग नाट्य लिहिले आणि ते तमाशातून सादर केले. 'मोहना बटाव' या वगनाट्यात म्हणजेच आख्यानक लावणीत एक प्रेमकथा मांडलेली आहे ही प्रेमकथा अहमदनगरची मोहना राणी आणि दिल्लीचा बटाव यांच्यातील सुरस अशी प्रेमकथा आहे. हा वग साधारणपणे इ. स. १८५६-६० च्या दरम्यान लिहिला आहे. पण ते वग आजही पूर्वी इतकाच रसिकांच्या मनावर गारूड करणारा आहे.



**प्रास्ताविक :-**

**तमाशा हा एक लोकप्रिय कलाप्रकार ही लोककला महाराष्ट्रात मध्ययुगीन कालखंडापासून अस्तित्त्वात आहे. 'तमाशा' या शब्दाचा विश्वकोशातील अर्थ 'उघडा देखावा'[1] असा आहे. तर प्रा. डॉ. प्रभाकर मांडे तमाशा या शब्दाचा अर्था सांगताना म्हणतात की, 'तमाशा हा शब्द अरबी असून प्रेक्षणीय दृश्य असा त्याचा अर्थ आहे.'[2] तर नामदेव व्हटकर तमाशाची संकल्पना मांडताना म्हणतात की, 'तमाशा हा शब्द मूळ पार्शियन भाषेतील आहे. तिथून तो उर्दूत आला उर्दूतून मराठी भाषेत रूढ झाला. उर्दूत आणि पार्शियन भाषेत त्याचा अर्थ मौजेचे, आनंद देणारा किंवा आश्चर्यकारक दृश्य असा आहे.'[3] या सर्व संकल्पनामधून असे लक्षात येते की, तमाशाचे मूळ भारतीय मातीत नसून ते परकीय उर्दू अरबी, पर्शियन भाषेत आहे. मात्र तमासा ही लोककला मराठी मातीत चांगल्या प्रकारे रूजली आहे. तमाशा ही लोककला महाराष्ट्रात मुसलमानी अमदानीत महाराष्ट्रात आली आहे. आणि तिचा येथे विकास झाला आहे. प्रारंभीच्या काळी मुसलमानी सैनिकांचे मनोरंजन करण्याच्या हेतूने तमाशाची निर्मिती झाली. केवळ करमणुकीच्या दृष्टीने आणि पैशाच्या मोबदल्यासाठी केले जाणारे बाजारू करमणुकीचे प्रकार मुसलमानी लोक व त्यांची संस्कृती या लोकांच्या संपर्काने महाराष्ट्रात आली असे करमणुकीचे खेळ मुसलमानी वस्ती व फौजांच्या छावण्यात, चव्हाट्यावर होत असत. तमाशाचे अभ्यासक नामदेव व्हटकर म्हणतात त्याप्रमाणे सुरूवातीच्या काळात विशुद्ध आनंद देणारे, मौजेचे किंवा आश्चर्यकारक दृश्ये कालांतराने मागे पडत गेली आणि तमाशात शृंगारिकता आली शिपाई गड्यांच्या विषय वासना चेतावणा-या बाबी तमाशात समाविष्ट झाल्या त्यामुळे तमाशास हिडीस रूप प्राप्त झाले. म्हणून तमाशास हीन अभिरूची असेलला कलाप्रकार असे लोक समजू लागले. तमाशातील ओंगळ, अश्लिल रूपामुळे त्यावर बंदी आणली पाहिजे असे त्याकाळी काही लोकांना वाटत होते. तमाशाचे हे ओंगळ रूप पाहून समाजस्वास्थ बिघडत आहे म्हणून जोतीराव फुले यांनी इंग्रज सरकारकडे एक पत्र पाठवून तमाशावर बंदी आणली पाहिजे अशी मागणी केली होती. नंतरच्या काळात त्यात काहीसा बदल घडला आणि समाजातील प्रतिष्ठित, सरदार, जहागीरदार असे उच्च अभिरूची असणा-या अभिजनांनी तमाशाला आश्रय दिला. बहुजनांनी तर त्याला पहिल्यापासूनच आश्रय दिला होता. त्यामुळे तमाशाला पुन्हा वैभवाचे दिवस आले अण्णाभाऊ साठे यांनी तमाशाचे रूप बदलून त्यास 'लोकनाट्य' असे नवे नाव दिले. या लोकनाट्यापासून अण्णाभाऊ साठे यांनी समाजप्रबोधनाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले होते. त्यात ते यशस्वी झाले आहेच असे दिसते.**

**तमाशा या लोककलेचा रचनाबंध आखीव, रेखीव स्वरूपाचा आहे. त्यात गण, गौळण, फार्स, बतावणी, सवाल-जवाब, रंगबाजी आणि वग असे त्याचे घटक आहेत. या सर्व घटकांना तमाशात महत्त्व आहे. परंतु त्यातील वगाला सर्वात जास्त महत्त्व आहे. तमाशातील वग हे आख्यानक लावणी प्रकारातील असतात. हे आख्यानक वग प्रामुख्याने पौराणिक, ऐतिहासिक घटना, प्रसंगावर आधारित असत. या आख्यानक लावणीचा हेतू रंजनाचा आहे. पण या वगामधून पौराणिक आख्याने लोकांसमोर ठेवली जात असत. कारण मध्ययुगात सर्व समाजावर धर्माचा प्रभाव होता. त्यामुळे साहित्य, कला हे क्षेत्र अध्यात्म धर्माने व्यापलेले होते. परंतु अव्वल इंग्रजी कालखंडात प्रबोधनाचे युग अवतरले होते. या नव्या प्रबोधनाच्या युगाने साहित्य, कला यांना नव्या दृष्टीने पाहण्याची नवी दृष्टी दिली. भौतिक विचारांची एक नवी परंपरा निर्माण झाली. त्याचा साहित्य, कलावर प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यातूनच 'इ. स. १८५०-६० च्या दरम्यान उमा-बाबूने मोहना-बटाव या कथाची रचना केली.'4 असे तमाशाचे अभ्यासक नामदेव व्हटकर यांनी म्हटले आहे.**

'मोहना-बटाव' हा वग पारंपरिक मराठी वगनाट्यापेक्षा वेगला आहे कारण या वगनाट्यात पौराणिक किंवा ऐतिहासिक विषय नाहीत तर या वगनाट्यात धर्म, अध्यात्म यांना दूर सारून लौकिक विषयाल हाताळले आहे. या वगनाट्यात एक अनोखी प्रेमकथा मांडलेली आहे. अहमदनगरची मोहना राणी आणि दिल्लीचा बटाव यांची शोकात्म प्रेमकथा या आख्यानक लावणीमध्ये म्हणजेच वगनाट्यात मांडलेली आहे. ती त्याकाळी अतिशय लोकप्रिय होती असे जुने जाणकार म्हणतात. परंतु या आख्यानक लावणीने आजही समाजावर रसिकावर गारूड केले आहे.

'मोहना बटाव' ही एक आख्यानक लावणी होती ती पेशवाईतील लावणीचे स्वरूप स्पष्ट करता नामदेव व्हटकर म्हणतात, की 'पेशवाईतील लावणी ही एक कविता होती, गीत होते, तीत कथाभाग आला तरी तो प्रासंगिक होता आणि एक नाटक होण्यासाठी तुटपुंजा होता. प्रथम घडलेल्या घटनेतून दुसरी घटना निघून तिचा एक 'ओघ' वाहत रहावा त्यातून उत्कंठा, निस्मय, सुख, दुःख, शृंगार यांची प्रेक्षकास रसनिष्पत्ती होत राहावी अशा प्रकारच्या लावणीचा दुसरा टप्पा मांडला असावा. अशा प्रकारची आख्यानक लावणी कवी नागेशाने लिहिली होती. तशाच प्रकारची आख्यानक लावणी उमा-बाबू यांनी रचिली. तिचेच नाव होते 'मोहना-बटाव' ही आख्यानक लावणी केवळ तेरा पृष्ठाची आहे. परंतु तमाशात तिचे ज्यावेळी सादरीकरण होते त्यावेळी ती रात्रभर चालते.

'मोहना-बटाव' ही एक अनोखी प्रेमकथा आहे. परंतु ती शोकात्म भाव प्रकट करणारी आहे. या वगनाट्याच्या सुरूवातीलाच कवी उमा-बाबू यांनी मोहना राणीच्या सौंदर्याचे अप्रतिम वर्णन केलेले आहे. हे वर्णन वाचताना मोहना राणी साक्षात रसिकांच्या मनात उभी राहते. इतके अप्रतिम वर्णन कवी शाहीराने केले आहे. तिच्या रूपाचे वर्णन करताना उमा-बाबूने म्हटले आहे की,

'मोहना नारीचे स्वरूप अनिवार
तनू सुकुमार
आलाया भार
खाशी दिसण्यात उमेतवार
फिरविती हात छातीवर
भिवया दोन्ही, चंद्राची कोर
तुटती तार
बाबरी हरिण डोळं टवकार
चमकली वीज अस्मानावर.'[5]

असे साक्षात वर्णन केले आहे. तिच्या रूपाचे बारकावे उमा-बाबूनी रसिकांच्या समोर माडले आहेत. या वर्णनामधून मोहनारीचे तंतोतंत रूप रसिकांच्या मनात उभे राहते मोहना नारी कशी दिसते यासाठी कवीने विविध प्रकारच्या प्रतिमा वापरल्या आहेत. त्यातून मोहना नारीचं रूप साऱ्या जगासमोर येत आहे. या रूपाला पाहून देशोदेशीचे तरूण प्रेमाने घायाळ झाले आहेत मोहनाच्या रूपाची बातमी पार दिल्लीपर्यंत गेली आहे. तेथील बटाव व्यापाराच्या निमित्ताने अहमदनगरला यायला निघाला आहे. हा सारा प्रवास अर्थातच चालत, घोड्यावरून होत आहे. पण या प्रवासात त्यांनी जे निसर्गाचे अप्रतिम रूप पाहिले आहे त्याचे वर्णन शाहीराने केले आहे पण त्याबरोबरच मोहना राणीच्या रूपाने घायाळ झालेल्या बटावाचे चित्रही येथे रंगविले आहे. बटाव

अहमदनगरला पोहचल्यावर त्याची आणि मोहना राणीची दृष्टादृष्ट झाली आहे याचे वर्णन करताना उमा बाबू म्हणतात की,

'झाली समदृष्टी – मुच्र्छा आली संगे दोघाला
जशी चांदणी जडाव जाहला
हिऱ्यापाशी हिरकणी शोभेला.'[6]

दोघांची दृष्टी भेट झाल्यानंतर ते एकमेकांच्या प्रेमात पडले आहेत. ती बटावाला भेटण्यास आतूर झाली आहे. तिने बटावासाठी भोजनाचा घाट घातला आहे. आपल्या प्रिय व्यक्तीसाठी जे भोजन बनविले आहे. त्यांचे वर्णन करताना उमा-बाबूंनी दोन पाने खर्च केली आहेत. यात कवीने महाराष्ट्रातील खाद्यसंस्कृतीची ओळख करून दिली आहे. परंतु त्यातून कवीने त्या दोघामधील प्रेमाचे वर्णन अधिक उठावदार केले आहे उमा बाबूने या लावणीचे वर्णन करताना यात रंजकता आली पाहिजे तसेच उत्कंठा, विस्मय आला पाहिजे यासाठी विशेष लक्ष दिले आहे. मोहना राणी आपल्या प्रियकराला भेटण्यासाठी साजशृंगार करून निघाली आहे. पण एवढ्यात एक जासूद येतो आणि निरोप देतो की, तिचा पती रामचंद्र युध्द मोहिमेवरून परत आली आहे. ही बातमी तिच्या साठी दुःखाची ठरते. कारण आपल्या पतीला ती विसरून गेली होती. ती बालवयात असताना तिचा विवाह झालेला असतो. आता ती तारूण्यात आलेली आहे. पती रामचंद्र अनेक वर्षांनी परत आला आहे. तो जीवंत आहे की मृत झाला आहे याबाबत मोहना राणीला काहीही माहिती नसते आणि आता तिचा जीव बटाववर जडलेला असतो. तिच्यासमोर पेच निर्माण होता. आता काय करायचे ? हा प्रश्न तिच्यासमोर असतो पण बटावावर असलेलं प्रेम तिला स्वस्थ बसू देत नाही ती काही कारस्थान करून पतीला राज्याच्या सीमेबाहेर घालविते आणि बटावाला भेटण्याचे प्रयत्न करते. परंतु बटाव ज्या बागेत थांबलेला आहे तेथेच राजा रामचंद्र थांबलेला असतो. दोघांची ओळख होते आणि बटावाचे खरे रूप त्याच्यासमोर येते आणि राजा त्याचा वध करतो. आणि मोहनालाही ठार करण्याचे ठरविती. आणि त्याप्रमाणे राजा रामचंद्राने बटावाला ठार केले. मोहना राणीने हे पाहताच बटावाच्या जवळच्या खंजीराने ती स्वतःवर वार करते आणि मरण पत्करते. आपल्या प्रेमासाठी ती मरण पत्करते अशी शोकांतिका या वगनाट्यात मांडलेली आहे.

उमा बाबूने मोहना बटाव या वगात दररोजच्या जीवनातील घटना, दाखले देऊन हे कल्पनाचित्र, शृंगारचित्र कवीने चितारले आहे यात उमा बाबूच्या जवळ असणारी शब्द संपत्ती निसर्गाचे उत्कट वर्णन, सुख, दुःख असे अप्रतिम वर्णन या वगनाट्यात केले आहे.

## निष्कर्ष :-

लोकरंगभूमीवरील तमाशा ही लोककला महाराष्ट्रात मध्ययुगीन कालखंडात सुरू झाला या लोककलेने मराठी माणसांचे रंजन केले आहे उमा बाबू सावळजकर या तमासगीराने 'मोहना-बटाव' नावाचे वगनाट्य लिहिले आहे. हे वगनाट्य अव्वल इंग्रजी कालखंडात लिहिले गेले आहे. या वगनाट्यात मोहन राणी आणि बटाव यांची प्रेमकथा मांडलेली आहे ती शोकात्म स्वरूपाची असली तरी रसिकांच्या मनावर गारूड करणारी आहे. कारण उमा-बाबूनी या आख्यानक लावणीमध्य म्हणजेच वगनाट्यात रंजकता ठासून भरलेली आहे म्हणून ते दीडशे वर्षापेक्षा ही जास्त वर्षे लोकप्रिय आहे.

## संदर्भ


1. (संपा.) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोश खंड ७ वा प्र. आ. १९७७ पृ. १५७.
2. प्रभाकर मांडे, लोकरंगभूमी, सविता प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९९२ पृ. १५.
3. नामदेव व्हटकर, मराठीचे लोकनाट्य तमाशा कला आणि साहित्य.
4. नामदेव व्हटकर, अजब पब्लिकेशन, कोल्हापूर, डिसेंबर 2009, पृ. 39.
5. विश्वनाथ शिंदे, सावळजकरांचा तमाशा - इतिहास आणि वाङ्मय, संस्कृती प्रकाशन पुणे प्र. आ. 2013.
6. विश्वनाथ शिंदे, उनि.
7. नामदेव व्हटकर उनि. पृ. 135.
8. नामदेव व्हटकर उनि. पृ. 148.